सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ११७ | शनिवार, दि. १७ जानेवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com




# आम्ही संस्थेचे मालक नसून विश्वस्त आहोत याचे कायम भान राहील : सी. ए. नीरज अग्रवाल

## प्रताप महाविद्यालयात झाला चेअरमन, व्हा. चेअरमन यांचा भव्य सत्कार सोहळा



*अमळनेर : खा. शि. मंडळाच्या सत्कार सोहळ्याप्रसंगी बोलताना चेअरमन नीरज अग्रवाल. व्यासपीठावर व्हा. चेअरमन जितेंद्र जैन, अध्यक्ष विनोद अग्रवाल, संचालक हरी भिका वाणी, संचालक पंकज मुंदडे, प्रदीप अग्रवाल, कमल कोचर, योगेश मुंदडे, सौ. लीनाताई पाटील, डॉ. संदेश गुजराथी, सौ. वसुंधराताई लांडगे, श्रीमती माधुरीताई पाटील, विनोद कदम सर, डी. व्ही. भलकार, राहुल पाटील सर, प्रभारी प्राचार्य एच. डी. जाधव, प्रा. डॉ. रमेश माने.*

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : आम्ही खानदेश शिक्षण मंडळाचे मालक नसून विश्वस्त आहोत, याचे आम्हाला कायम भान राहील. विद्यार्थी केंद्रित कार्यपद्धतीसाठी आम्ही कटिबद्ध आहोत. आगामी काळात संस्थेची भरभराट करणे हेच आमचे ध्येय आहे. काम करताना आमच्याकडून काही चुका झाल्यास त्या अवश्य लक्षात आणून द्या. येत्या सहा महिन्यात संस्थेचे सात वर्षांचे ऑडिट पूर्ण करू, असे अभिवचन खानदेश शिक्षण मंडळाचे नवनिर्वाचित चेअरमन सीए नीरज अग्रवाल यांनी दिले.

संस्थेच्या प्रताप महाविद्यालयात शुक्रवार, दि. १६ जानेवारी झालेल्या चेअरमन आणि व्हाईस चेअरमन यांच्या सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष विनोद अग्रवाल सभेच्या अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर व्हाईस चेअरमन जितेंद्र जैन, उपाध्यक्ष कमल कोचर, श्रीमती माधुरीताई पाटील, विश्वस्त सौ. वसुंधराताई लांडगे, संचालक डॉ. संदेश गुजराथी, योगेश मुंदडे, हरी भिका वाणी, प्रदीप अग्रवाल, पंकज मुंदडे, सौ. लीनाताई पाटील, संस्थेचे चिटणीस पराग पाटील, प्रभारी प्राचार्य एच. डी. जाधव, मुख्याध्यापक प्रतिनिधी विनोद कदम सर, प्राध्यापक प्रतिनिधी डी. व्ही. भलकार, शिक्षक प्रतिनिधी राहुल पाटील आदी उपस्थित होते.

श्री. अग्रवाल पुढे म्हणाले, की संस्थेसमोर येणाऱ्या सर्व समस्यांना समर्थपणे न्याय देण्याचा प्रयत्न करू. आम्ही संस्थेची साडेतीन कोटी रुपयांची बिल्डिंग लेबर कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने केवळ १ कोटी ८० लाखात बांधून पूर्ण केली. पुढील वर्षी एम. फार्म मिळवण्यासाठी आमचे जोरदार प्रयत्न असतील. पीबीए इंग्लिश मीडियम स्कूलचेही नूतनीकरण करणार आहोत. प्रथम हायस्कूललाही अपडेट करण्यासाठी जे काही करता येणे शक्य असेल ते निश्चितपणे करू. प्रताप महाविद्यालयाच्या लायब्ररीत ९० हजार विविध प्रकारची पुस्तके आहेत. मात्र, या पुस्तकांच्या ५ टक्केही विद्यार्थ्यांनी सदर पुस्तके वाचली नाहीत किंवा ग्रंथालयातही गेले नाहीत. संस्थेत साडेचार ते पाच कोटी रुपयांची बहुमूल्य व नाजूक उपकरणे आहेत. त्यामुळे लवकरच आम्ही संस्थेचे ग्रंथालय आणि प्रयोगशाळा यासाठी स्वतंत्र इमारती बांधणार आहोत. महाविद्यालयाचे मैदानही नव्याने अद्यावत करणार आहोत. संस्थेत व्यवसायाभिमुख

पान ३ वर

### नीरज अग्रवाल यांनी केले वातावरण भावनिक

नीरज अग्रवाल यांनी या त्रैवार्षिकात त्यांच्यासोबत असलेल्या सहकाऱ्यांचा अत्यंत आदरपूर्वक उल्लेख केला. तसेच मागील त्रिवार्षिकातील पदाधिकाऱ्यांची गौरवपूर्ण आठवण काढून वातावरण भावनिक केले होते. संस्थेचा प्रगतीचा एकूणच लेखाजोखाही त्यांनी यावेळी मांडला.

### दिनविशेष

१७ जानेवारी

- अपारंपारिक ऊर्जा क्षेत्रातील सूर्या पुरस्कार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एम. जी. ताकवले यांना जाहीर.
- कथ्थक नृत्यांगना डॉ. रोहिणी भाटे यांना मध्य प्रदेश सरकारचा कालिदास सन्मान जाहीर.

### गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**



*अमळनेर : संत शिरोमणी रोहीदास महाराज यांच्या प्रतिमापूजनप्रसंगी मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष तथा नगरसेवक डॉ. डिंगबर महाले, नरेश कांबळे, एकनाथ मोरे, प्रवीण वाघ आदी.*

# अमळनेरच्या चर्मकार समाजाचा एक गाव- एक मिरवणुकीचा निर्धार

## एक फेब्रुवारीला संत शिरोमणी रवीदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त निघणार शोभायात्रा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील चर्मकार समाज संत शिरोमणी रवीदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त शहर व ग्रामीण भागात वेगवेगळ्या वेळी व ठिकाणी शोभायात्रा काढत होते. मात्र, यापुढे एक गाव- एक मिरवणूक असा निर्धार सर्व समाजबांधवांनी केला. याबाबत श्री मंगळग्रह मंदिर येथे बुधवार, दि. १४ जानेवारी रोजी झालेल्या बैठकीत सर्व संमतीने हा निर्णय झाला. मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष तथा नगरसेवक डॉ. डिगंबर महाले अध्यक्षस्थानी होते. यावेळी एकनाथ मोरे, प्रवीण वाघ, नरेश कांबळे, साहेबराव चव्हाण, गणेश जाधव, रवींद्र ठाकरे व रवींद्र साळुंखे व्यासपीठावर उपस्थित होते. सुनील मोरे, सागर मोरे व कमलेश विसावे व डॉ. डिगंबर महाले यांनी मनोगते व्यक्त केली.

**संत रवीदासांच्या स्मारकाचाही निर्धार**

शहरात सर्वत्र विविध साधू-संत आणि समाजसुधारकांची स्मारके आहेत. मात्र, अनेकदा मागणी करूनही संत रवीदास महाराज यांचे स्मारक उभारले गेले नाही. संत रवीदासांचा इतिहास व त्यांची थोरवी माहीत नसल्यानेही कदाचित असे घडले असावे, अशी खंत उपस्थितांनी व्यक्त केली. आता सर्व समाजबांधव मिळून खासदार स्मिताताई वाघ, आमदार अनिलदादा पाटील व नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांना याबाबत निवेदन देणार आहेत. वर्षभरात स्मारक न झाल्यास समाजबांधव वर्गणी करून संत रवीदासांचे स्मारक बांधतील, असा निर्धारही यावेळी करण्यात आला.

### असा साजरा होईल जयंती उत्सव

१ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता मरिमाता मंदिराजवळील संत रवीदास महाराज यांच्या मंदिरात सामुहिक पूजनाचा कार्यक्रम होईल. तेथून मिरवणुकीस प्रारंभ होईल. मिरवणूक माळीवाडा, वाडी चौक, सराफ बाजार, मोठा बाजार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकमार्गे गांधलीपूरा येथे सांगता होईल. तेथेही पूजनाचा कार्यक्रम होईल. त्यानंतर मरिमाता मंदिराजवळ प्रसाद वाटप होईल.



*अमळनेर : बैठकीस उपस्थित समाजबांधव.*

# बालिका विनयभंगप्रकरणी वृद्धास अटक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील एका बालिकेच्या विनयभंगप्रकरणी हनुमंत यादव पाटील (वय ६५) या वृद्धास मारवड पोलिसांनी अटक केली आहे.

ही घटना मंगळवार, दि. १३ जानेवारी रोजी एकलहरे शिवारात घडली होती. हनुमंत यादव याने बालिका उभी असताना तीला खळ्यात बोलावून तीचा विनयभंग केला होता. याप्रकरणी पोक्सो कायद्यांतर्गत मारवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, वृद्धास अटक करण्यात आली आहे. पोलीस उपअधीक्षक विनायक कोते तपास करीत आहेत.





# परदेशात घेतले शिक्षण, एमएनसी कंपनीतील नोकरी सोडली

## सक्सेस स्टोरी कबीर चंद्राकर आता या शेतीतून करतात कोट्यवधींची कमाई

**ग्लोबल महातजे वृत्तसेवा**

स्वप्न पाहण्याची हिंमत आणि त्या स्वप्नांना सत्यात उतरवण्यासाठी जिद्द असेल, तर मातीसुद्धा सोने पिकवते, याचे जीवंत उदाहरण म्हणजे छत्तीसगडच्या रायपूरमधील कबीर चंद्राकर. उच्च शिक्षण, परदेशी संधी आणि कॉर्पोरेट करिअरचे आकर्षण बाजूला ठेवून त्यांनी शेतीचा मार्ग निवडला आणि आज ते केवळ स्वतःच यशस्वी उद्योजक झाले नाहीत, तर इतर शेतकऱ्यांसाठीही प्रेरणास्थान ठरले आहेत. केंद्र सरकारच्या योजनांचा योग्य वापर करून त्यांनी आधुनिक शेतीचा आदर्श निर्माण केला आहे.

### परदेशात शिक्षण घेतले

कबीर चंद्राकर यांनी परदेशात उच्च शिक्षण घेतले आहे. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांच्यासमोर मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध होत्या. मात्र त्यांनी सुरक्षित आणि आकर्षक वाटणारा कॉर्पोरेट मार्ग न निवडता शेतीकडे वळण्याचा धाडसी निर्णय घेतला. पारंपरिक शेतीऐवजी आधुनिक तंत्रज्ञान, नियोजन आणि बाजारपेठेचा अभ्यास करून त्यांनी फळबाग लागवडीचा व्यवसाय सुरू केला.

२०१४-१५ या कालावधीनंतर त्यांच्या शेती व्यवसायाला खऱ्या अर्थाने चालना मिळाली. केंद्र सरकारच्या राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाकडून (एनएचबी) मिळालेल्या कर्ज आणि अनुदानाचा त्यांनी प्रभावीपणे वापर केला. सुरूवातीला अवघ्या सहा एकरांवर पेरूची लागवड सुरू केलेल्या चंद्राकर यांनी टप्प्याटप्प्याने आपला व्यवसाय विस्तारला. आज त्यांची पेरूची बाग ११५ ते १२० एकरांपर्यंत पोहोचली आहे.



### ११५ ते १२० एकर क्षेत्रावर लागवड

रायपूरचे रहिवासी असलेले कबीर चंद्राकर सध्या तब्बल ११५ ते १२० एकर क्षेत्रावर पेरूची लागवड करतात. त्यांच्या शेतात उत्पादित होणारे दर्जेदार पेरू केवळ देशांतर्गत बाजारातच नव्हे, तर परदेशातही निर्यात केले जातात. शेती म्हणजे केवळ उदरनिर्वाहाचे साधन नसून ती एक फायदेशीर उद्योग ठरू शकते, हे त्यांनी आपल्या कामातून सिद्ध केले आहे.

### दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा टर्नओव्हर

चंद्राकर सांगतात, की पेरूच्या लागवडीतून चौथ्या वर्षापासून चांगले उत्पन्न मिळू लागले. सध्या ते प्रतिएकर अंदाजे पाच ते सहा लाख रुपयांचे वार्षिक उत्पन्न घेत आहेत. एकूण उत्पन्नाचा विचार करता त्यांचा शेती व्यवसाय दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा टर्नओव्हर निर्माण करतो. योग्य नियोजन, सातत्य आणि सरकारी योजनांचा लाभ घेतल्यास शेतीतही मोठे यश मिळविता येते, हे त्यांच्या अनुभवातून स्पष्ट होते.

मात्र, हा प्रवास सोपा नव्हता. सुरूवातीच्या काळात त्यांना पिकाच्या विक्रीसाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागला. सुरुवातीला त्यांनी रायपूर परिसरातच पेरूची विक्री सुरू केली. हळूहळू त्यांनी ओडिशा, बिहार यांसारख्या राज्यांमध्ये आपला बाजार विस्तारला. आज त्यांच्या शेतातील पेरू दिल्ली आणि मुंबईसारख्या मोठ्या बाजारपेठांपर्यंत पोहोचतात.

व्यवहाराच्या सुरूवातीच्या टप्प्यात आर्थिक अडचणी आणि विश्वासाचा अभाव जाणवत होता. मात्र, व्यापाऱ्यांशी दीर्घकालीन आणि विश्वासार्ह संबंध निर्माण केल्यानंतर या समस्या दूर झाल्या. आज कबीर चंद्राकर यांची ओळख यशस्वी शेतकरी-उद्योजक म्हणून होत असून, त्यांची कथा तरुणांना शेतीकडे वळण्याची नवी प्रेरणा देत आहे.

# सचिन तेंडुलकरचा लाडका लेक अर्जुनचे सानियासोबत या महिन्यात होणार लग्न?

## शुभमंगल सावधान!



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरच्या घरात लवकरच सनई-चौघडे वाजणार आहेत. सचिन तेंडुलकरचा लाडका लेक अर्जुन तेंडुलकरचे यावर्षी लग्न होणार असल्याची माहिती समोर येत आहे. ऑगस्ट २०२५ मध्ये अर्जुन आणि सानिया चंडोकचा साखरपुडा झाला. जवळचे मित्रपरिवार आणि नातेवाईकांच्या उपस्थितीत दोघांचा साखरपुडा पार पडला होता. एका सार्वजनिक कार्यक्रमादरम्यान सचिन तेंडुलकरनंही त्यांच्या साखरपुड्याच्या वृत्तास दुजोरा दिला होता. सानिया मुंबईतील प्रसिद्ध उद्योजक रवी घई यांची नात आहे.

### अर्जुन तेंडुलकर आणि सानिया चंडोकचा लग्नसोहळा कधी?

एका प्रसिद्धी माध्यमातील वृत्तानुसार अर्जुन तेंडुलकर आणि सानिया चंडोक यांचे लग्न ५ मार्च २०२६ रोजी पार पडणार आहे. लग्नाशी संबंधित अन्य कार्यक्रम ३ मार्चपासून सुरू होतील. सर्व कार्यक्रम कदाचित मुंबईमध्येच पार पडतील. लग्नसोहळ्यामध्ये केवळ खास मित्रपरिवार आणि कुटुंबातील सदस्यच उपस्थित असतील.

### कोण आहे सानिया चंडोक?

सानिया चंडोक ही पेट इंडस्ट्रीमधील एक यशस्वी उद्योजिका आहे. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून तिने बिझनेस मॅनेजमेंट या विषयामध्ये पदवी संपादित केली आहे. पाळीव प्राण्यांबाबत तिला विशेष आवड आहे. हीच आवड तिने व्यवसायात बदलण्याचा निर्णय घेतला. Mr. Paws Pet Spa & Store LLP नावाने एक आलिशान पेट स्पा तिने सुरू केले आहे. तिच्या या कंपनीची वार्षिक कमाई सुमारे ९० लाख रुपये आहे.

घई कुटुंब हॉस्पिटॅलिटी आणि खाद्य उद्योग प्रसिद्ध आहेत. त्यांच्या व्यवसाय इंटरकॉन्टिनेंटल हॉटेल आणि ब्रुकलिन क्रीमरीशी संबंधित आहेत.

# हिवाळ्यातही लिंबू पाणी पिण्याचे चमत्कारी फायदे



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

लिंबाच्या रसामध्ये 'क' जीवनसत्त्व भरपूर असते. लिंबू खाल्ल्याने रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि शरीराचे विविध रोग व संसर्गांपासून संरक्षण होते. लिंबाच्या रसात सायट्रिक ॲसिड असते, जे अपचन व पोटफुगीसारख्या समस्या दूर करण्यास मदत करते. 'क' जीवनसत्त्वाव्यतिरिक्त लिंबाच्या रसामध्ये पोटॅशियम, मॅग्नेशियम व कॅल्शियमदेखील असते. उन्हाळ्यात अनेक जण लिंबाचा रस आवर्जून पितात. पण हिवाळ्यात लिंबाचा रस वा लिंबू पाणी सेवन करावे की नाही? हा द्रवपदार्थ शरीरासाठी फायदेशीर आहे की हानिकारक? हे आपण जाणून घेऊ...

### हिवाळ्यात लिंबू पाणी प्यावे का?

हिवाळ्यात भूक जास्त लागते आणि त्यामुळे या दिवसांत लोक उन्हाळ्यापेक्षा जास्त आहार घेतात. त्यामुळे तळलेले आणि जंक फूडचे सेवनही जास्त प्रमाणात केले जाते, ज्यामुळे पोट बिघडणे आणि वजन वाढण्याच्या समस्यांचा त्रास होतो. तो टाळण्यासाठी तुम्ही लिंबू पाणी पिऊ शकता. त्यामुळे पचनाच्या समस्या दूर होणे आणि वजन घटवणे यांसाठी मदत होते. हिवाळ्यात त्वचा निस्तेज आणि कोरडी होऊ शकते. लिंबू पाणी प्यायल्याने त्वचेची चमक सुधारते आणि शरीरातील विषाक्त घटक बाहेर पडण्यासही मदत होते.

### हिवाळ्यात लिंबू पाणी पिण्याची योग्य वेळ आणि पद्धत

लिंबू आरोग्यासाठी फायदेशीर असला तरी त्याचे जास्त प्रमाणात सेवन करणे हानिकारकदेखील असू शकते. हिवाळ्यात तुम्ही कोमट पाण्यात लिंबाचा रस मिसळून पिऊ शकता; परंतु एक ग्लासापेक्षा जास्त लिंबू पाणी पिणे टाळा.

या दिवसात लिंबू पाणी प्यायल्याने रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि सर्दी, खोकला, ताप यांपासून संरक्षणही होते.

लिंबू पाणी शरीराला संसर्गाशी लढायला मदत करते.

लिंबू पाणी प्यायल्याने शरीर डिटॉक्स व्हायला आणि यकृत स्वच्छ ठेवण्यास मदत मिळते. तसेच त्यामुळे शरीरातील विषाक्त घटक बाहेर टाकले जातात. त्याशिवाय त्वचा स्वच्छ व तेजस्वी दिसते. लिंबू पाणी थकवा कमी करण्यासाठी उपयुक्त ठरते. कमजोरी, चक्कर येणे कमी करण्यासही मदत करते.

# भारत का सबसे ताकतवर सरकारी अफसर

## जिसे माना जाता है प्रधानमंत्री का राइट हैंड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारत सरकार में कई बड़े और अहम पद होते हैं, लेकिन इनमें सबसे ज्यादा ताकत और जिम्मेदारी कैबिनेट सचिव के पास होती है। यह वही अफसर है जिसे प्रधानमंत्री का दायां हाथ कहा जाता है और जिसकी सलाह पर कई बड़े सरकारी फैसले तय होते हैं।

### १) सबसे वरिष्ठ और महत्वपूर्ण अधिकारी

भारत में कैबिनेट सचिव को पूरे प्रशासनिक ढांचे का सबसे वरिष्ठ और महत्वपूर्ण अधिकारी माना जाता है। यह वही अफसर होता है जो प्रधानमंत्री को देश से जुड़े बड़े मुद्दों पर सलाह देता है और मंत्रालयों के कामकाज में तालमेल बनाकर रखता है।

### २) दफ्तर नई दिल्ली के साउथ ब्लॉक में है

कैबिनेट सचिवालय का दफ्तर नई दिल्ली के साउथ ब्लॉक में है, जो पीएमओ के बिल्कुल नज़दीक है। नाम भले ही साधारण लगता हो, लेकिन इस विभाग का दायरा सरकार की असली ताकत दिखाता है।

### ३) मंत्रिमंडल को सलाह और मदद देता है

कैबिनेट सचिवालय तीन हिस्सों जिसमें, सिविल, मिलिट्री और इंटेलिजेंस के रूप में काम करता है। इनमें से सिविल विंग सबसे महत्वपूर्ण है, क्योंकि यही केंद्रीय मंत्रिमंडल को सलाह और मदद देता है।

### ४) सभी विभागों की रिपोर्ट भेजने की जिम्मेदारी


किसी भी बड़े संकट या आपात स्थिति में मंत्रालयों के बीच तालमेल बैठाने की मुख्य जिम्मेदारी कैबिनेट सचिव की होती है। इसके अलावा राष्ट्रपति, उपराष्ट्रपति और मंत्रियों को हर महीने सभी विभागों की रिपोर्ट भेजना भी इसी विभाग का काम है।

### ५) धारा ३७० हटाने में अहम भूमिका निभाई

कैबिनेट सचिवालय ने जम्मू-कश्मीर से जुड़ी ऐतिहासिक प्रक्रिया धारा ३७० हटाने और राज्य को दो केंद्र शासित प्रदेशों में बांटने में भी अहम भूमिका निभाई थी। इस दौरान खुफिया एजेंसियों और सरकार के बीच बड़ा समन्वय इसी ने संभाला।

### ६) वर्तमान में टीवी सोमनाथन भारत के कैबिनेट सचिव

वर्तमान में १९८७ बैच के आयएएस अधिकारी टीवी सोमनाथन भारत के कैबिनेट सचिव हैं। सरकार ने उन्हें दो साल के लिए इस पद पर नियुक्त किया है।



# 'अगं अगं सूनबाई! काय म्हणताय सासूबाई?'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हळुवारपणे स्त्रीमनाची गुंतागुंत सादर करणे हे केदार शिंदे यांचे आता वैशिष्ट्य झाल आहे. २००४ मध्ये आलेल्या त्यांच्या 'अग्गंबाई अरेच्चा' पासून 'यंदा कर्तव्य आहे', 'बकुळा नामदेव घोटाळे', 'इरादा पक्का', 'अग्गंबाई अरेच्चा २' ते अलीकडच्या 'बाईपण भारी देवा' पर्यंत त्यांच्या चित्रपटांमध्ये 'बाईपण' नेहमीच माणूसपणाशी जोडलेले दिसते. 'श्रीयुत गंगाधर टिपरे' मालिकेतील शामल असो किंवा त्यांच्या सिनेमांतील इतर नायिका; त्यांचे 'बाईपण' म्हणजे अनुभवातून आलेली शहाणपणाची ताकद, सहनशीलतेतून जन्मलेली समज आणि आस्थेतून येणारी माणुसकी असते. 'अगं अगं सूनबाई! काय म्हणताय सासूबाई?' हा चित्रपट याच बाईपणाच्या 'बळा'चा भावस्पर्शी आरसा ठरतो. सासू-सूनेमधील आरडाओरड, आरोप-प्रत्यारोप किंवा सरधोपट विनोदांऐवजी हा सिनेमा स्त्रीमनाच्या आत खोलवर उतरतो आणि या नात्यांमधल्या अव्यक्त भावनांना शब्द देतो.

स्त्रीप्रधान कथांना व्यावसायिक यशाची जोड देणाऱ्या केदार शिंदे यांनी यावेळी सासू-सुनेच्या नात्याकडे पाहण्याचा पारंपरिक चष्मा बाजूला ठेवला आहे. स्त्री ही केवळ संघर्ष करणारी व्यक्ती नाही, तर ती विचार करणारी, निर्णय घेणारी आणि बदल घडवणारी शक्ती आहे. 'अगं अगं सूनबाई!...' हा चित्रपट या विचाराच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करतो. चित्रपटाची सुरूवात ओळखीच्या घरगुती वातावरणातून होते परंतु पहिल्या काही मिनिटांतच दिग्दर्शक प्रेक्षकांना सावध करतो की, ही कथा केवळ सासू-सुनेच्या कुरबुरींपुरती मर्यादित नाही.




स्मिता देसाई (सासू- निर्मिती सावंत), अरुण देसाई (राजन भिसे), मनस्वी (सून प्रार्थना बेहेरे) आणि सौरभ (नकुल घाणेकर) असे हे चौकोनी कुटुंब. सासू-सुनेची रोजची भांडणे आणि मधल्यामध्ये पोराची ओढाताण येथेही आहेच. शेवटी मनस्वी आणि सौरभ वेगळे राहण्याचे ठरवतात. परंतु या अपेक्षित संघर्षाला मिळणाऱ्या एका अनपेक्षित वळणानंतर कथा एका वेगळ्याच भावनिक पातळीवर जाते. चित्रपटाच्या शीर्षकात सुचविल्याप्रमाणे गोष्ट केवळ 'सासू.. स्मिता' आणि 'सून.. मनस्वी' यांच्याकडे संपूर्णपणे केंद्रित होते. तेथेच हा चित्रपट सासू-सुनेच्या साचेबद्ध मेलोड्रामापासून वेगळा दिसू लागतो. भावनिक आक्रोश दोन्ही व्यक्तिरेखांमध्ये असला, तरी तो कृत्रिम वाटत नाही. येथे 'कोण बरोबर, कोण चूक' याचा हिशेब नसून 'आपण एकमेकांचे ऐकतो का?' हा प्रश्न केंद्रस्थानी येतो. 'तुझं माझं जमेना' पासून सुरू झालेला चित्रपट 'तुझ्या वाचून करमेना'च्या टोकापर्यंत घेऊन जातो. हा प्रवास भावनिक आणि मानसिकदृष्ट्या काही अंशी थकवणारासुद्धा आहे. कारण व्यक्तिरेखांचे मानसिक चढउतार अत्यंत थेट आणि ठळकपणे पडद्यावर दाखविले आणि ते संवादातूनही व्यक्त झालेले आहेत. चित्रपटाच्या कथानकातील 'धक्कातंत्र' आणि संवादलेखन हे या चित्रपटाचे बलस्थान आहे. वैशाली नाईक आणि ओमकार दत्त यांनी लिहिलेले संवाद अतिशय संयत, खोलवर भिडणारे आहेत. तर अनेकदा संवादांपेक्षा मौन अधिक बोलके ठरते. स्त्रीच्या मनातल्या असंख्य भावना.. राग, प्रेम, असुरक्षितता, अपेक्षा; या केवळ नजरेतून, देहबोलीतून प्रकट होतात. याचे श्रेय दिग्दर्शक केदार शिंदे यांचे. त्यासोबतच पटकथेतील प्रतिकात्मकता, विविध वस्तू, कृतींची पेरणी यामुळे कथेला विशिष्ट खोली प्राप्त होते. अगदी साडीच्या निऱ्यांपासून ते भींतीवरील 'फॅमिली फोटो' पर्यंत अनेक गोष्टींचा प्रतिकात्मकतेसाठी वापर केलेला आहे. मात्र पटकथेत काही बाबींची पुनरावृत्ती खटकते. काही भावनिक क्षण जरा लांबवलेले आहेत, ज्यामुळे चित्रपटाची गती मध्येमध्ये मंदावते. हा चित्रपट बरेच प्रश्न उपस्थित करतो, परंतु सर्व प्रश्नांची उत्तरं न देता काही उत्तरे प्रेक्षकांवरच सोडतो, ही सूचकताही उल्लेखनीय आहे.

निर्मिती सावंत आणि प्रार्थना बेहेरे यांच्या जोडीने हा चित्रपट खांद्यावर पेलला आहे. निर्मिती सावंत यांनी साकारलेली सासू अनुभवसंपन्न, कडक वाटणारी पण आतून हळवी आहे. त्यांच्या अभिनयात कुठेही भडकपणा नाही. प्रार्थना बेहेरेने साकारलेली सून आजच्या काळातल्या सुनेचे प्रतिनिधित्व करते; ती बंडखोर नाही, पण गप्प बसणारीही नाही. या दोघींमधील केमिस्ट्रीही अत्यंत स्वाभाविक भासते. त्यामुळे अनेकदा प्रेक्षक अंतर्मुख होतात. निर्मिती यांचा बंद खोलीतला कपाळावरील टिकलीचा प्रसंग आणि प्रार्थनाचा बंद गाडीतील किंकाळीचा प्रसंग ही त्याची ठळक उदाहरणे आहेत.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# गलवाडे रस्त्यावरील धोकादायक वळण ठरतेय अपघातास निमंत्रण

## बांधकाम विभागाचे दूर्लक्ष; दिशादर्शक फलक नसल्याने वाहनचालक त्रस्त

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील गलवाडे रस्त्यावरील मुख्य वळण अत्यंत धोकेदायक आहे. जणू अपघातास ते निमंत्रणच ठरत आहे. त्यावर एक मोठा खड्डा पडल्याने अपघाताचा मोठा धोका आहे. विशेष म्हणजे कुठलेही दिशादर्शक फलक नसल्याने वाहनचालक त्रस्त आहेत. याकडे बांधकाम विभागाचे कमालीचे दूर्लक्ष आहे.


*अमळनेर : गलवाडे रस्त्यावरील धोकादायक वळण व पडलेला खड्डा. (छायाचित्र : रजनीकांत पाटील)*

गलवाडेमार्गे झाडी, नरडाणा, शिंदखेडा तालुक्यासाठी हा मार्ग महत्वाचा आहे. या मार्गावर रोज दुचाकी, चारचाकी वाहने, लक्झरी बस, एस. टी. महामंडळाच्या बस गाड्या, अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. मात्र, वळण रस्त्यावर वाहनचालकांना अंदाज येत नाही. परिणामी दुचाकी, चारचाकी तसेच अवजड वाहने थेट खड्ड्यात जाऊन आदळतात. विशेषतः शहराबाहेर पडताना हे वळण लागते. त्यानंतर पुढे रस्ता कुठे वळतो, कोणत्या दिशेने जातो यासाठी दिशादर्शक फलक नसल्याने वाहनचालकांना कळत नाही. परिणामी अनेक वाहनचालक रस्ता चुकतात व कोणाला तरी विचारून त्यांना पुढे मार्गक्रमण करावे लागते. या ठिकाणी पडलेला मोठा खड्डा तत्काळ बुजवणे, रस्त्याची दुरुस्ती करणे, स्पष्ट दिशादर्शक फलक व सूचना फलक लावणे तसेच आवश्यक तेथे स्पीड ब्रेकर व रिफ्लेक्टर बसवावेत, अशी मागणी वाहनचालक व नागरिकांकडून होत आहे.

## पत्ता जुगाराचे अड्डे सर्रास सुरू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील विविध भागात पत्ता जुगाराचे अड्डे सर्रास सुरू आहेत. याकडे पोलिसांचे दूर्लक्ष आहे. जुगारामुळे अनेक कुटुंब आर्थिक अडचणीत आले आहेत. तरुण पिढीही या व्यसनाकडे वळत असल्याची चिंता व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, या अड्ड्यांची माहिती असूनही कारवाई होत नसल्याने पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही ठोस पावले उचलली जात नसल्याचा आरोप होत आहे. जुगारामुळे भांडणे, हाणामारीचे प्रकार वाढत आहेत. पोलीस प्रशासनाने दखल घेऊन संबंधित ठिकाणी छापे टाकून कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकामधून होत आहे.



# निवडणुकीच्या धुराळ्यात हरवली श्वासांची लढाई!

## डी. ए. धनगर यांची खंत : हवेचा गुणवत्ता निर्देशांक धोक्याच्या पातळीवर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्यात महापालिका निवडणुकांचा चांगला धुराळा उडाला आहे. मात्र, राजकारणामुळे नागरिकांचा श्वास मात्र दिवसेंदिवस कोंडत चालला आहे. प्रचार, सभा, घोषणा यांचा गोंधळ असताना शहरातील हवेचा गुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) थेट १५० च्या आसपास पोहोचला आहे. मात्र, या गंभीर विषयाकडे सत्ताधारी आणि प्रशासनाचे दुर्लक्ष झाले आहे, अशी चिंता पर्यावरण अभ्यासक डी. ए. धनगर यांनी व्यक्त केली आहे.



शहरातील रस्त्यांवर साचलेली धूळ, खुलेआम सुरू असलेली बांधकामे आणि अपूर्ण स्वच्छता व्यवस्था यामुळे हवेतील प्रदूषणात मोठी भर पडत आहे. वातावरणात उडणारी धूळ हीच सध्या प्रदूषणाची मुख्य कारणीभूत घटक ठरत असल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे. दिलासादायक बाब म्हणजे नायट्रोजन डायऑक्साईड, ओझोन, सल्फर डायऑक्साईड व कार्बन मोनॉक्साईड यांसारखे घटक सध्या नियंत्रणात आहेत.

मात्र, धुळीकडे दूर्लक्ष केल्यास परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकते. या वाढत्या प्रदूषणाचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे. खोकला, श्वसनाचा त्रास, डोळ्यांची जळजळ, डोकेदुखी, घसा खवखवणे, छातीत दुखणे, उलटी, सांधेदुखी अशा तक्रारी मोठ्या प्रमाणावर समोर येत आहेत. विशेषतः हृदयविकार, दमा यांसारख्या जुनाट आजारांनी ग्रस्त रुग्ण, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिक यांना याचा अधिक फटका बसत आहे. त्यातच दिवसागणिक बदलणारे हवामान, कधी थंडी तर कधी उष्णता, यामुळे शरीरावर अतिरिक्त ताण येत आहे. अशा परिस्थितीत प्रदूषणाची भर पडल्याने अनेक कुटुंबे चिंतेत सापडली आहेत. फक्त शहर व रस्त्यांवरील धूळ नियंत्रणात आणली तरी प्रदूषण बऱ्याच अंशी आटोक्यात येऊ शकते, असे मत धनगर यांनी व्यक्त केले आहे. संबंधित यंत्रणांनी तातडीने उपाययोजना करून रस्त्यांवरील धूळ नियंत्रणात आणावी, बांधकामांवर नियमांची काटेकोर अंमलबजावणी करावी आणि नागरिकांना दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणीही पर्यावरणप्रेमींकडून होत आहे.


*अमळनेर : हृदयरोग तपासणी शिबिरात डॉ. ऋषिकेश तामसेकर यांचा सत्कार करताना डॉ. रवींद्र कुळकर्णी, डॉ. संदीप जोशी. शेजारी उपस्थित लायन्स क्लबचे पदाधिकारी व सदस्य.*

# हृदयरोग तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

## १०२ नागरिकांची तपासणी, १४ रुग्णांना मोफत शस्त्रक्रियेची संधी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील लायन्स क्लब, नर्मदा मेडिकल फाऊंडेशन व एसएमबीटी हॉस्पिटल (नाशिक) यांच्यातर्फे शुक्रवार, दि. १६ जानेवारी रोजी अस्मी सीटी स्कॅन व डायग्नोस्टिक सेंटर येथे हृदयरोग तपासणी शिबिर झाले. शिबिराचा १०२ रूग्णांनी लाभ घेतला आहे. १४ रूग्णांना मोफत शस्त्रक्रियेची संधी उपलब्ध आहे. त्यांना २६ जानेवारी रोजी नाशिक येथील एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये विनामूल्य नेण्यात येणार आहे.


लहान मुलांसाठी (वय ० ते १८ वर्षे) मोफत हृदयरोग तपासणी व २डी इको सेवा उपलब्ध करून देण्यात आली होती. तर प्रौढांसाठी केवळ ५० रुपयांमध्ये नाव नोंदणी, तसेच ईसीजी, शुगर आणि बीपी तपासणी विनामूल्य करण्यात आली. २डी इको तपासणी अत्यल्प दरात म्हणजे ५०० रुपयांमध्ये उपलब्ध होती. हृदयरोग तज्ञांच्या उपस्थितीत सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत तपासणी प्रक्रिया पार पडली. डॉ. ऋषिकेश तामसेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्यसेवक सूर्यकांत पाटील, नितीन कोळी, प्राची सोनवणे व दीपिका साबळे यांनी तपासणीसाठी कामकाज केले. यावेळी लायन्स क्लबचे अध्यक्ष डॉ. संदीप जोशी, सचिव महेंद्र पाटील, खजिनदार नितीन विंचूरकर, प्रोजेक्ट चेअरमन मनिष जोशी, प्रदीप जैन, सुनील चौधरी, एचदी भरुचा, रवींद्र कॉलरा, डॉ. मिलिंद नवसारीकर, पंकज मुंदडा, डॉ. रवींद्र जैन, प्रकाश शहा, चंद्रकांत महाजन, शेखर धनगर आदी उपस्थित होते.

# प्रा. रवींद्र माळी यांच्या पुस्तकाचे श्री स्वामी नारायण गुरुकुलात प्रकाशन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील प्रा. रवींद्र माळी लिखित फार्मसी, लॉ अ‍ॅण्ड एथिक्स या विषयावरील पुस्तकाचे श्री स्वामीनारायण विश्व मंगल गुरुकुलात नुकतेच प्रकाशन झाले. सर्व संत गण व स्थानिक मंत्री ना. गजेंद्रसिंग जी. परमार यांच्या उपस्थितीत हे प्रकाशन करण्यात आले.

प्रा. माळी हे श्री स्वामीनारायण विश्व मंगल गुरुकुल व स्वामी नारायण युनिव्हर्सिटी (कलोल, जि. गांधीनगर, गुजरात) फार्मसी महाविद्यालयात सेवारत आहेत. त्यांच्या गौरवपूर्ण कार्याचे गुरुकुलचे व युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष स्वामी प्रेमस्वरूपदासजी, संत भक्तवत्सलजी, भक्तीनंदनजी व सर्व गुरुकुल मधील संत, युनिव्हर्सिटीचे कुलगुरु डॉ. रूपेश वसाणी, रजिस्ट्रार डॉ. अजित गंगावने, विविध शाखेचे डिन, सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारीवर्ग व विद्यार्थी तसेच येथील क्षत्रिय कांच माळी समाजाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सर्व पंच मंडळ सदस्य, समाजबांधव, मित्र परिवार, अमळनेर येथील फार्मसी महाविद्यालयाचे सहकारी प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. प्रा. रविंद्र माळी हे अमळनेर येथील बी बियाणे व किटकनाशक औषध विक्रेते गंगाराम दोधू महाजन यांचे पूत्र आहेत.



*कलोल (गुजरात) : प्रा. रवींद्र माळी लिखित पुस्तक प्रकाशनप्रसंगी स्वामी प्रेमस्वरूपदासजी, संत भक्तवत्सलजी, भक्तीनंदनजी आदी.*

## सीसीआय कापूस खरेदीसाठी स्लॉट बुकिंगचे आवाहन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : सीसीआय कापूस खरेदीसाठी शनिवार, दि. १७ जानेवारी रोजी सकाळी साडेनऊ वाजता स्लॉट बुकिंग सुरू होणार आहे. येथील लक्ष्मी जीन व लामा जीन सोमवार, दि. १९ जानेवारी ते शुक्रवार, दि. २३ जानेवारीपर्यंत खुले राहणार आहे. शेतकऱ्यांनी मोबाईलद्वारे स्लॉट बुकिंग करून घ्यावेत. बाजार समितीत स्लॉट बुकिंग होणार नाही, असे आवाहन सभापती अशोक पाटील यांनी केले आहे.

# साई इंग्लिश अकॅडमितर्फे उद्या पुस्तक, लेखक ओळख स्पर्धा

## अ‍ॅड. भय्यासाहेब मगर यांचा अभिनव उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील साई इंग्लिश अकॅडमीतर्फे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी, या उद्देशाने रविवार, दि. १८ जानेवारी रोजी पुस्तक व लेखक स्पर्धा होणार आहे. शासनाने अमळनेर शहराला 'पुस्तकांचे गाव' म्हणून घोषित केले आहे. या पार्श्वभूमीवर अकॅडमीचे संचालक अ‍ॅड. भय्यासाहेब मगर यांच्यातर्फे हा अभिनव उपक्रम राबविला जात आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना निवडक व दर्जेदार ५० पुस्तकांची व त्यांच्या लेखकांची ओळख करून दिली जाणार आहे. विद्यार्थ्यांना आधीच पुस्तक व लेखकांची यादी देण्यात येणार आहे. त्यावर आधारित ही स्पर्धा घेण्यात येईल. त्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेपुरते नव्हे, तर आयुष्यभर उपयोगी पडेल. विद्यार्थ्यांना वाचनविषयक ज्ञान मिळणार आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना विविध साहित्यप्रकार, थोर लेखक वत्यांच्या साहित्याची ओळख होईल, तसेच भविष्यात हीच पुस्तके वाचण्याची सवय लागेल, अशी अपेक्षा अ‍ॅड. मगर यांनी व्यक्त केली आहे.



# आम्ही संस्थेचे मालक नसून विश्वस्त आहोत याचे कायम भान राहील : सी. ए. नीरज अग्रवाल


*अमळनेर : खा. शि. मंडळाच्या चेअरमन, व्हा. चेअरमन सत्कार सोहळ्याप्रसंगी उपस्थित मान्यवर.*


*अमळनेर : सत्कार सोहळ्याप्रसंगी उपस्थित आमदार अनिलदादा पाटील. शेजारी अध्यक्ष विनोद अग्रवाल, चेअरमन नीरज अग्रवाल, व्हा. चेअरमन जितेंद्र जैन, संचालक योगेश मुंदडे, पंकज मुंदडे, हरी भिका वाणी, प्रदीप अग्रवाल, बाळू पाटील, गोविंदा बाविस्कर, देवेंद्र कांबळे आदी.*

**पान १ वरून**

व रोजगाराभिमुख जास्तीत जास्त कोर्सेस आणण्यासाठी आम्ही प्रयत्नशील होतो, आहोत व राहू. प्रताप महाविद्यालयाला नीटचे परीक्षा केंद्र मिळाले आहे. भविष्यात जेईई परीक्षा केंद्र व्हावे, यासाठीही प्रयत्न करू. आमच्यावर ज्यांनी आरोप केले त्यालाच आम्ही आमचे बळ म्हणून भविष्यात कार्य करू, असेही श्री. अग्रवाल यांनी सांगितले. प्रा. डॉ. रमेश माने यांनी सूत्रसंचालन केले.

**यांची होती उपस्थिती**

आमदार अनिलदादा पाटील व भाजपच्या युवा नेत्या भैरवीताई वाघ- पलांडे यांनीही प्रताप महाविद्यालयात येऊन नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी आशीर्वाद पॅनलचे नेते तथा संस्थेचे माजी चेअरमन कुंदनलालजी अग्रवाल, बजरंगलालजी अग्रवाल, मोहनशेठ जैन, माजी संचालक विनोदभय्या पाटील यांच्यासह माजी संचालक डॉ. बी. एस. पाटील, कल्याण पाटील व मोहनभाऊ सातपुते, अ‍ॅड. सौ. ललितताताई पाटील, सौ. राजश्रीताई पाटील, माजी प्रभारी कुलगुरू एस. ए.अण्णा पाटील, एस. के. सोमाणी, निवृत्त प्राचार्य एस. आर. चौधरी व प्रकाश शिरोडे, उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, उपप्राचार्य एस. ओ. माळी, माजी नगरसेवक मुन्ना शर्मा, विवेक देशमुख, सुनील चौधरी, प्रदीप जैन, मुन्ना जैन, मदनशेठ ओस्तवाल, दीपचंद अग्रवाल, नगरसेवक नाविद शेख, ज्ञानेश्वर धनगर, जिभाऊ धनगर, बाजार समितीचे माजी संचालक पराग पाटील, शितल देशमुख, उमेश वाल्हे, राकेश पाटील, देवा लांडगे, राजू नांढा, प्रशांत सिंघवी, जितेंद्र गोहिल, अविनाश अमृतकर, प्रकाश शहा, मिलिंद शहा, सौ. संध्या शहा, हेमंत पवार, प्रा. पी. टी. धर्माधिकारी, मंगळग्रह सेवा संस्थेचे सचिव एस. बी. बाविस्कर, चंद्रकांत महाजन, विक्रांत पाटील, जीतू ठाकूर, राकेश पाटील, शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुरेश पाटील, बाळू पाटील, गोविंदा बाविस्कर, स्वादिष्ट नमकीनचे संचालक विजय पाटील, नीलेश पाटील, शेखरअप्पा धनगर, नगरसेवक देवेंद्र कांबळे आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.


*अमळनेर : सत्कार सोहळ्याप्रसंगी चेअरमन नीरज अग्रवाल, व्हा. चेअरमन जितेंद्र जैन यांचा सत्कार करताना भैरवीताई पलांडे-वाघ व मान्यवर.*


*अमळनेर : चेअरमन नीरज अग्रवाल व व्हा. चेअरमन जितेंद्र जैन यांचा सत्कार करताना परिवार सदस्या. शेजारी सौ. राजेश्रीताई पाटील आदी.*


*अमळनेर : सत्कार सोहळ्याप्रसंगी उपस्थित चेअरमन नीरज अग्रवाल, व्हा. चेअरमन जितेंद्र जैन, मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष तथा नगरसेवक डॉ. डिगंबर महाले व मान्यवर.*

# मौनी अमावास्येला काय करावे आणि काय करू नये? या गोष्टी लक्षात ठेवा



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू पंचांगानुसार माघ महिन्यातील कृष्ण पक्षातील अमावास्येला मौनी अमावास्या म्हणतात. सर्व अमावास्यांमध्ये ही सर्वांत महत्त्वाची आणि फलदायी मानली जाते. यावर्षी मौनी अमावास्या रविवार, १८ जानेवारी २०२६ रोजी साजरी केली जाईल.

या दिवशी मौन धारण करण्याला विशेष महत्त्व आहे. कारण त्यामुळे मानसिक शक्ती प्राप्त होते. शास्त्रांनुसार या दिवशी पवित्र नद्यांमध्ये स्नान व दान केल्यास अश्वमेध यज्ञासारखे पुण्यफळ मिळते. मात्र या शुभ फळांसाठी काही खास नियम पाळणे आवश्यक आहे. चला तर मग जाणून घेऊया.

**मौनी अमावास्येला काय करावे?**

या दिवशी सूर्योदयापूर्वी एखाद्या पवित्र नदीत स्नान करावे. शक्य नसेल तर घरच्या घरी अंघोळीच्या पाण्यात गंगाजल घालून स्नान करा. या दिवसाचे नावच 'मौनी' आहे, म्हणून संपूर्ण दिवस किंवा किमान स्नान-पूजेपर्यंत मौन पाळण्याचा प्रयत्न करा. जर पूर्ण मौन शक्य नसेल तर वाईट बोलणे टाळा. अमावास्या तिथी पितरांना अर्पण केलेली आहे. त्यामुळे या दिवशी पूर्वजांच्या नावाने



तर्पण व दान करा. यामुळे पितृदोषातून मुक्ती मिळते. मौनी अमावास्येला तीळ, गूळ, उबदार कपडे, धान्य तसेच जोडे-चप्पल दान करणे अतिशय शुभ मानले जाते. यावर्षी हा दिवस रविवार असल्यामुळे सूर्यदेवांना अर्घ्य अर्पण करा आणि लाल रंगाच्या वस्तूंचे दान करा. या दिवशी 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' किंवा 'ॐ नमः शिवाय' या मंत्रांचा मनातल्या मनात जप करत राहा. या दिवशी ब्रह्मचर्याचे पालन करावे.

**मौनी अमावस्येला काय करू नये?**

- या पुण्यतिथीला सकाळी उशिरापर्यंत झोपणे टाळा.
- मौनी अमावास्या संयमाचा दिवस आहे. त्यामुळे घरात भांडण, वादविवाद किंवा कोणाचाही अपमान होईल असे वर्तन करू नका.
- या दिवशी मांस, मद्य, लसूण, कांदा यांसारख्या तामसिक पदार्थांचे सेवन अजिबात करू नये. सात्त्विक भोजन घ्या किंवा उपवास ठेवा.
- अशी मान्यता आहे, की अमावास्येच्या रात्री नकारात्मक शक्ती अधिक सक्रिय असतात, म्हणून रात्री निर्जन ठिकाणी किंवा स्मशानभूमीजवळ जाणे टाळा.

**करा हा उपाय**

- १८ जानेवारी २०२६ हा रविवार असल्यामुळे या दिवशी 'रवी-मौनी अमावास्या' असे म्हटले जाईल. हा योग सूर्यदेवांची कृपा मिळविण्यासाठी अत्यंत शुभ मानला जातो.
- या दिवशी तांब्याच्या लोट्यात पाणी घेऊन त्यात लाल फूल व अक्षता घालून सूर्यदेवांना अर्घ्य अर्पण करा.

**ॐ सूर्याय नमः**




# १८ जानेवारीपासून मंगळ आणि बुधात गृहयुद्ध

## 'या' तीन राशींनी राग आणि वाणीवर ठेवा नियंत्रण... नकारात्मक परिणामांची शक्यता



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ज्योतिषशास्त्रानुसार मंगळ आणि बुध या दोन महत्त्वाच्या ग्रहांमध्ये एक धोकादायक युद्ध होणार आहे. याचा तीन राशींच्या आर्थिक परिस्थितीवर, वर्तनावर आणि मानसिक स्थितीवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. १६ जानेवारी २०२६ रोजी मंगळ मकर राशीत प्रवेश केला आणि काही तासांनंतर १७ जानेवारी २०२६ रोजी बुध मकर राशीत प्रवेश केला. यामुळे मंगळ आणि बुध यांच्यात केवळ युतीच झाली नाही तर त्यांच्यात आता युद्ध देखील होण्याची शक्यता आहे.

ज्योतिषशास्त्रानुसार मंगळ आणि बुध मकर राशीत २७ अंशांवर भ्रमण करत आहेत. जेव्हा ग्रह एकाच राशीत २७ अंशांवर भ्रमण करतात तेव्हा त्याला गृहयुद्ध म्हणतात. मंगळ आणि बुध हे शत्रू ग्रह असल्याने या संघर्षाचा परिणाम जास्त असेल. मंगळ ऊर्जा, क्रोध आणि धैर्य दर्शवतो, तर बुध बुद्धी, वाणी, व्यवसाय आणि निर्णयक्षमतेचे प्रतिनिधित्व करतो. म्हणूनच २१ जानेवारी २०२६ पर्यंत काही राशींसाठी जीवनाचे पैलू अंदाजे चार दिवसांसाठी विस्कळीत होऊ शकतात. मंगळ-बुध संघर्षामुळे कोणत्या राशींवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो याबाबत सविस्तर जाणून घेऊया.

**मेष राशी**

मेष राशीच्या लोकांना राग येण्याची शक्यता असते. ते रागाच्या भरात एखाद्याला दुखावू शकतात. याचा नातेसंबंधांवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. ते चुकीचे निर्णय घेऊ शकतात आणि त्यामुळे नुकसान होऊ शकते. व्यवसायातही तोटा होण्याची शक्यता असते.

**मिथुन राशी**

मिथुन राशीच्या लोकांना गैरसमज होऊ शकतात. म्हणून संभाषणात स्पष्टता ठेवा, नाहीतर मतभेद निर्माण होऊ शकतात. ते चुकीचे निर्णय घेऊ शकतात. म्हणून निर्णय सुज्ञपणे घ्या.

**कन्या राशी**

मंगळ आणि बुध यांच्यातील संघर्षामुळे कन्या राशीच्या लोकांवर ताण वाढेल आणि ते जास्त विचार करू शकतात. नकारात्मकता टाळा. ध्यान करा.

# मौनी अमावास्येला चंद्र करणार शनीच्या राशीत प्रवेश

## 'या' तीन राशींच्या दारी देवी लक्ष्मी येणार; बक्कळ पैसा अन् नोकरी-व्यवसायात भरभराट होणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ज्योतिषशास्त्रानुसार प्रत्येक त्याच्या ठराविक वेळेनंतर राशी परिवर्तन आणि नक्षत्र परिवर्तन करतो ज्याचा शुभ-अशुभ प्रभाव मानवी जीवनावर पाहायला मिळतो. ज्योतिषशास्त्रानुसार चंद्र एकमेव असा ग्रह आहे जो सर्वात वेगवान गतीने एका राशीतून दुसऱ्या राशीत प्रवेश करतो. तो एका राशीमध्ये जवळपास अडीच दिवस राहतो. त्यामुळे बऱ्याचदा काही राशींमध्ये चंद्राची दुसऱ्या ग्रहाबरोबर युती निर्माण होते. या युतीचा काही राशींच्या व्यक्तींवर शुभ तर काही राशींवर अशुभ परिणाम पाहायला मिळतो.

पंचांगानुसार चंद्र १८ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजून ४० मिनिटांनी धनू राशीतून शनीच्या मकर राशीत प्रवेश करणार आहे. तो २१ जानेवारी २०२६ मध्यरात्री ०१ वाजून ३५ मिनिटांपर्यंत या राशीत विराजमान असेल. दरम्यान, १८ जानेवारी रोजी मौनी अमावास्या असून या दिवशी चंद्राचे गोचर १२ पैकी काही राशींच्या लोकांसाठी अनुकूल सिद्ध




होईल.

**चंद्राचे गोचर मालामाल करणार**

**वृश्चिक :** चंद्राचा मकर राशीतील प्रवेश वृश्चिक राशीसाठी खूप अनुकूल सिद्ध होईल. या काळात तुमच्या मनातील सर्व इच्छा पूर्ण होतील. गुंतवणूक करणे फायदेशीर ठरेल. स्पर्धा परीक्षेची तयार करणाऱ्यांनाही यशाचे गोड फळ लाभेल. फक्त मेहनत कायम ठेवा. अविवाहितांसाठी लग्नाचे अनेक प्रस्ताव येतील. नोकरी करणाऱ्यांना कामात सकारात्मक बदल दिसून येतील. कुटुंबीयांसोबत फिरायला जाल.

**मकर :** चंद्राचा मकर राशीतच प्रवेश होणार आहे. त्यामुळे हे राशी परिवर्तन तुमच्यासाठी खूप अनुकूल सिद्ध होईल. आर्थिक समस्या दूर होतील. या काळात अडकलेली कामे पूर्ण होतील. तुमचा आत्मविश्वास वाढेल. आयुष्यात सुख-समृद्धी वाढेल. कुटुंबीयांसोबत प्रवास घडेल. नोकरीत पदोन्नती मिळण्याची दाट शक्यता आहे. आर्थिक परिस्थिती उत्तम राहील आणि कुटुंबात आनंदाचे वातावरण असेल. नव्या नोकरीच्या शोधात असणाऱ्यांना नवी संधी मिळेल.

**कुंभ :** चंद्राचा मकर राशीतील प्रवेश कुंभ राशीच्या व्यक्तींसाठी खूप लाभदायी सिद्ध होईल. हा काळ तुमच्यासाठी सकारात्मक सिद्ध होईल. आत्मविश्वासात वाढ होईल. आनंदी वार्ता कानी पडतील. समाजात मानसन्मान वाढेल. या काळात आर्थिक परिस्थिती उत्तम राहील. कुटुंबात शुभकार्ये होतील. आरोग्य तक्रारी बंद होतील. परदेशात जाण्याचे योग आहेत. मानसिक तणावातून मुक्त व्हाल. वैवाहिक जीवन सुखमय असेल.



# मौनी अमावास्येला दुर्मिळ योगायोग

## पितृदोषापासून मुक्तीसाठी सर्वांत खास उपाय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पितृदोषापासून मुक्तीसाठी मौनी अमावास्येचा योग अतिशय शुभ मानला जातो, अशी हिंदू धर्मात मान्यता आहे. त्या अनुषंगाने नेमके काय आहेत खास उपाय ते जाणून घेऊया.

**पितृदोष उपाय**

मौनी अमावास्येला पूर्वजांना तर्पण अर्पण करणे विशेष महत्त्वाचे मानले जाते. मौनी अमावास्येला 'पौष अमावास्या' असेही म्हणतात. धार्मिक श्रद्धेनुसार या दिवशी पूर्वजांची पूजा आणि तर्पण अर्पण केल्याने त्यांना प्रसन्नता मिळते आणि त्यांच्या मुलांना आशीर्वाद मिळतो. ज्यामुळे जीवनात सुख आणि समृद्धी येते. शास्त्रांमध्ये असे म्हटले आहे, की मौनी अमावास्येला तर्पण अर्पण केल्याने अनेक फायदे होतात. यंदा २०२६ मध्ये मौनी अमावास्या रविवार, १८ जानेवारी रोजी सर्वत्र साजरी केली जाईल.

**योग-संयोग**

यंदा मौनी अमावास्येला, १८ जानेवारी २०१६ रोजी सूर्य आणि चंद्राचा एक दुर्मिळ संयोग मकर राशीत निर्माण होत आहे. ज्यामुळे शनीची राशी असलेल्या त्रिग्रही योगाची निर्मिती होत आहे. त्यामुळे एक अत्यंत शुभ योग निर्माण होतो. या दिवशी सूर्य आणि चंद्राचा संयोग खूप फायदेशीर मानला जातो. या दिवशी सर्वार्थ सिद्धी योग देखील तयार होतो.

**मौनी अमावास्येसाठी विशेष उपाय**

पौष किंवा मौनी अमावास्येच्या दिवशी सूर्योदयापूर्वी स्नान करा आणि स्वच्छ कपडे घाला. शक्य असल्यास पवित्र नदी किंवा तलावात स्नान करा. 1. स्टील किंवा तांब्याच्या भांड्यात पाणी, काळे तीळ, कुश गवत, बार्ली आणि थोडे दूध मिसळा. तुमच्या पूर्वजांची नावे जपा आणि भक्तीने त्यांचे ध्यान करा. हातात पाणी धरा आणि तुमच्या अंगठ्या आणि तर्जनीमध्ये हळूहळू ओतून तर्पण करा. या वेळी "ओम पितृभ्यो नमः" हा मंत्र जप करा. तर्पणानंतर, अन्न, कपडे किंवा दक्षिणा दान करा; हे अत्यंत शुभ मानले जाते.

**खालील मंत्र देखील जपू शकता**

**मंत्र :** 'ॐ आगच्छन्तु में पितर इमं गृहन्तु जलान्जिलम'

**अर्थ :** "या, माझ्या पूर्वजांनो, मी अर्पण केलेली जलांजली स्वीकारा."

**(टीप : याप्रसंगी दक्षिणेकडे तोंड करून नैवेद्य अर्पण केले जातात. कारण ही दिशा पूर्वजांची दिशा मानली जाते. अशा प्रकारे नैवेद्य अर्पण केल्याने ते प्रसन्न होतात आणि त्यांचे आशीर्वाद मिळतात.)**

मौनी अमावस्येला केलेले उपाय निश्चितच आपणास पूर्वजांच्या शापांपासून मुक्त करतील आणि जीवन शांती, समृद्धी आणि आनंदाने भरतील. या दिवसाचे योग्य पालन केल्याने तुमचे आध्यात्मिक जीवन सुधारेलच असे नाही तर तुम्हाला प्रत्येक बाबतीत फायदा होईल.

# मौनी अमावास्येच्या दिवशी कोणत्या झाडाची पूजा करावी?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सनातन धर्मात मौनी अमावास्या खूप शुभ मानली जाते. या दिवशी भगवान शिवाची योग्य पद्धतीने पूजा करण्याची प्रथा आहे. असे म्हटले जाते, की या दिवशी राहूचा प्रभाव जास्त असतो. ज्यामुळे या दिवशी भगवान शिवाची पूजा केल्याने शुभ फळ मिळू शकते. आता अशात या अमावस्येच्या तिथीला पिंपळ आणि बेल वृक्षांची पूजा करणे शुभ मानले जाते.





**पिंपळाच्या झाडाची पूजा करण्याचे महत्त्व**

हिंदू पंचागानुसार मौनी अमावास्येचा दिवस खूप खास असतो. हा दिवस तपश्चर्या, ध्यान आणि उपासनेसाठी विशेषतः महत्त्वाचा मानला जातो. मौनी अमावास्या म्हणजे 'मूक अमावास्येचा उपवास' आणि हा दिवस आत्म्याचे शुद्धीकरण, पापे धुण्यासाठी आणि देवाची कृपा प्राप्त करण्यासाठी विशेषतः योग्य मानला जातो. या दिवशी पिंपळाच्या झाडाची पूजा करण्याचेही विशेष महत्त्व आहे. पिंपळाचे झाड भगवान विष्णूचे प्रतीक मानले जाते. या दिवशी पिंपळाच्या झाडाखाली बसून पूजा केल्याने व्यक्तीचे सर्व पाप नष्ट होतात आणि त्याचा आत्मा शुद्ध होतो. पिंपळाच्या झाडाची पूजा केल्याने घरात सुख, समृद्धी आणि संपत्ती वाढते. या दिवशी पिंपळाच्या झाडाखाली दिवा लावल्याने गरिबी दूर होते आणि देवाची कृपा प्राप्त होते.

**बेल वृक्षाची पूजा करण्याचे महत्त्व**

भगवान शिव यांना बेल वृक्ष खूप प्रिय आहे. हिंदू धर्मात असे मानले जाते, की भगवान शिवाच्या चरणी द्राक्षांचा वेल अर्पण केल्याने त्यांचे आशीर्वाद मिळतात. विशेषतः अमावस्येच्या दिवशी बेल वृक्षाची पूजा केल्याने भाविकांना विशेष लाभ होतो. या दिवशी वेलीच्या पानांनी शिवलिंगाची पूजा केल्याने पुण्य आणि कल्याण मिळते. बेल वृक्षाची पूजा केल्याने व्यक्तीचे सर्व पाप नष्ट होतात आणि त्याला मोक्ष मिळतो. मौनी अमावस्येच्या दिवशी, जेव्हा एखादी व्यक्ती मौन पाळून बेल वृक्षाची पूजा करते तेव्हा त्याची मानसिक शांती आणि ध्यान वाढते.

# आपणास ठाऊक आहे का शनी देवांची १६ वैशिष्ट्ये

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



१) सूर्यपुत्र शनी देव मृत्युलोकाचे असे अधिपती स्वामी आहेत, की जे वेळ आल्यावर माणसाला ज्याचा-त्याचा चांगल्या किंवा वाईट कर्मांच्या आधारांवर दंड देऊन सुधारण्यासाठी प्रवृत्त करतात.

२) शनी हे आधुनिक काळातील न्यायाधीश आहेत. न्याय नेहमी न आवडणारा असतो म्हणूनच तो क्रूर मानला जातो.

३) शनी देवाचा मूळ रंग काळा आहे. ज्यावर अजून कोणता रंग चढतच नाही.

४) शनीचे धातू लोखंडी आहेत. जे सर्वांत योग्य आणि शक्तिशाली आहेत.

५) शनीच्या आवडणाऱ्या वस्तू तेल, कोळसा, लोखंड, काळे तीळ, उडीद, जोडे-चपला देणगी म्हणून दिल्या जातात.

६) शनी देवांच्या स्थापनेत वेळ आणि श्रमांचे आंशिक दान हे सर्वश्रेष्ठ दान मानले गेले आहे.

७) शनी देव हे अध्यात्माचे गुरू आहेत. कोणत्याही पूजा, उपासनेसाठी त्यांचे फळ मिळविण्यासाठी शनी महाराजांची उपासना, पूजा करणे आवश्यक आहे.

८) श्री शनी देव संस्थेचे स्वामी आहेत. त्यांच्या कृपेशिवाय संयुक्त कुटुंबाची कल्पना करणे अशक्य आहे.

९) शनी देव सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आध्यात्मिक, प्रशासकीय, शिक्षण, व्यवसाय इत्यादींमध्ये उंची देण्याचे काम करतात.

१०) शनी देव रोगमुक्ती आणि आयुष्यवृद्धीची इच्छा पूर्ण करतात.

११) शनी देव आजच्या युगातील कलियुगातील देव आहेत.

१२) शनी देवांचे शस्त्र-धनुष्य, बाण आणि त्रिशूळ आहेत.

१३) शनी देवांपासून राजा ते रंकापर्यंत सर्वेच घाबरलेले आणि प्रभावित आहे.

१४) शनी देव हे नश्वर जगतातील एक शाश्वत आणि असामान्य देव आहेत.

१५) शनी देवांचे वाहन गिधाड आणि रथ लोखंडाचे बनलेले आहेत.(मत्स्यपुराण १२७.८)

१६) शनी देवांची अनेक नावे आहेत. त्यांचे कार्य क्षेत्र मोठे आणि पसरलेले आहे.

# मौनी अमावास्येच्या दिवशी व्रत कथा अवश्य ऐका, पुण्य लाभेल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प्राचीन काळी देवस्वामी नावाचा एक ब्राह्मण कांचीपुरम नावाच्या शहरात राहत होता. त्यांच्या पत्नीचे नाव धनवती होते. त्याला सात मुलगे आणि एक मुलगी होती. मुलीचे नाव गुणवती होते. गुणवतीच्या लग्नासाठी देवस्वामींनी आपल्या मुलाला कुंडली दाखविण्यासाठी ज्योतिषाकडे पाठविले. ज्योतिषाने सांगितले, की गुणवतीचे लग्न होताच ती विधवा होईल. देवस्वामी आणि धनवती खूप दुःखी झाले. त्यांनी ज्योतिष्याला त्यावर उपाय विचारला. ज्योतिषाने सांगितले, की सिंहल बेटावर एक पतिव्रता स्त्री राहते जिचे नाव सोमा धोबीन आहे. जर सोमाने गुणवतीच्या घरी येऊन लग्नापूर्वी पूजा केली तर हा दोष दूर होईल.

देवस्वामींनी त्यांच्या मुलीला त्यांच्या धाकट्या मुलासह बेटावर पाठविले. भाऊ आणि बहीण दोघेही समुद्रकिनारी पोहोचले आणि ते ओलांडण्याचा विचार करू लागले. जेव्हा त्यांना कोणताही मार्ग सापडला नाही तेव्हा ते भुकेले आणि तहानलेले एका पिंपळाच्या झाडाखाली विश्रांती घेऊ लागले. त्या झाडावर एक गिधाड कुटुंब राहत होते. गिधाडाच्या मुलांनी भाऊ आणि बहिणीमधील संपूर्ण संभाषण ऐकले. त्यांनी त्याच्या आईला दोघांनाही मदत करण्यास सांगितले. गिधाडाच्या आईने भाऊ आणि बहिणी दोघांनाही समुद्र पार करण्यास मदत केली.

गुणवती आणि तिचा भाऊ सोमा धोबीच्या घरी पोहोचले. सोमा धोबीने त्याचे सर्व म्हणणे ऐकले आणि त्याला मदत करण्याचे मान्य केले. ती गुणवतीच्या घरी आली आणि तिच्या लग्नापूर्वी पूजा केली. यामुळे गुणवतीचा विधवात्वाचा शाप दूर झाला.

**व्रत कथा ऐकण्याचे महत्त्व काय?**

मौनी अमावास्येच्या दिवशी व्रत कथा ऐकण्याचे विशेष महत्त्व आहे. ही कथा ऐकल्याने व्यक्तीचे सर्व पाप दूर होतात आणि त्याला पुण्य प्राप्त होते. ही कथा व्यक्तीला संयम, धैर्य आणि श्रद्धेचा संदेश देते.

**दानाचेही विशेष महत्त्व**

या दिवशी गरिबांना दान केल्याने पुण्य मिळते. या दिवशी तीळ, कपडे, अन्न आणि दक्षिणा दान करावी. मौनी अमावास्येच्या दिवशी गंगा स्नान करण्याचेही विशेष महत्त्व आहे. या दिवशी गंगा स्नान केल्याने व्यक्तीचे सर्व पाप धुऊन जातात आणि त्याला मोक्ष मिळतो.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)